# ऑथेलोः विल्यम शेक्सपियर
मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**प्रास्ताविकः**

शेक्सपियरच्या काळात नाटक करण्यासाठी रंगमंच, पडदे, हॉल, लाउडस्पीकर, मेकअप, लाइटस् अशा काहीही सोयी नव्हत्या. सर्कसच्या तंबूसारखी मोकळी जागा, त्याच्या थोड्याशा चढावरच्या जागेवर रंगमंच साकारायचा. आणि समोर  उतरत्या जागेवर प्रेक्षक समोर, दोन्ही बाजूला उभे राहून नाटक पाहायचे. प्रेक्षकांची जागा थोड्याशा खोलगट जागेत असायची, त्यामुळे त्या जागेला 'पिट' म्हणायचे.

१. कलाकारांना मोठ्या आवाजात बोलावे लागे.
२. नाटकाचे प्रयोग दुपारी उशीरा उजेडात व्हायचे.
३. स्थळ सूचक वस्तूंच्या द्वारे सुचवले जायचे; उदा. छोटी झाडांची फांदी म्हणजे अरण्य किंवा बाग, पलंग म्हणजे बेड रूम.
४. काळ/वेळ हे पात्रांच्या तोंडून सुचवले जात असत. उदा. 'रोमिओ ऍंड ज्युलिएट' मध्ये रोमिओ मित्राला विचारतो, 'Is the day so young? आणि मित्र उत्तरतो, 'But new struck nine.' या बाबतीत प्रेक्षक आणि कलाकार यांच्यात खूप सामंजस्य असायचे.
५. स्त्रिया नाटकात काम करत नसल्याने तरूण नाजूक पुरुष स्त्रियांच्या भूमिका करत. प्रेक्षक फार चोखंदळ नसायचे.

**प्रमुख पात्रेः**

| | |
|---|---|
| ड्यूक | व्हेनिसचा अधिपती |
| ब्रॅबॅन्शिओ | ड्यूकचा एक मंत्री [सीनेटर] |
| ऑथेलो | ड्यूकचा सेनापती; दर्यासारंग |
| डेस्डेमोना | ब्रॅबॅन्शिओची एकुलती एक मुलगी; ऑथेलोची पत्नी |
| इयागो | ऑथेलोचा विश्वासू अधिकारी |
| कॅसिओ | ऑथेलोचा कनिष्ठ अधिकारी; तरुण, कर्तबगार |
| एमिलिया | इयागोची पत्नी; डेस्डेमोनाची विश्वासू मैत्रिण |
| बियांका | कॅसिओची प्रेयसी |

**कथानकः**

व्हेनीस हे इटलीमधील एक प्रमुख शहर [ज्यांनी युरोप सहल केली असेल त्यांना तेथील कॅनॉल मधील सजवलेले गोंडोला नक्कीच आठवत असतील व सहल पण]. पूर्वी व्हेनिस हे स्वतंत्र संस्थान होते. त्या संस्थानाचा अधिपती ड्यूक असतो. ब्रॅबॅन्शिओ हा त्याचा एक विश्वासू मंत्री [सीनेटर] असतो. या संस्थानाचा सेनापती ऑथेलो हा काळा कभिन्न आफ्रिकन मूर [मोरोक्को देशाचा नागरिक] असतो. तो इतका काळा आणि ओबडधोबड होता की त्याच्यावर कोणीही स्त्री कधी प्रेम करेल असे वाटले नसते. पण ब्रॅबॅन्शिओची एकुलती एक सुंदर, सुशील, सुस्वभावी मुलगी

डेस्डेमोना त्याच्यावर भाळली होती. खरं तर सुंदर व श्रीमंत डेस्डेमोनाशी विवाह करण्यासाठी व्हेनिसमधील अनेक श्रीमंत उमराव युवक इच्छुक होते; पण स्त्रियःचरित्रं........ एका इंग्लीश कवीने म्हटले आहे, 'It is strange, beautiful women eat crazy salad'. ऑथेलो बऱ्याच वेळा ब्रॅबॅन्शिओबरोबर आपल्या पूर्वायुष्यातील हलाखीच्या जीवनाबद्दल आणि त्याने केलेल्या पराक्रमी मोहिमांच्या सुरस घटनाबद्दल बोलत असे. त्या ऐकून डेस्डेमोनाच्या मनात ऑथेलोबद्दल सहानुभूती व प्रेम निर्माण झालेले असते.

आपले कथानक सुरू होते त्यावेळी ऑथेलो व डेस्डेमोना या दोघांनी गुप्तपणे विवाह केलेला असतो. ऑथेलोचा एक अधिकारी इयागो ही वार्ता ब्रॅबॅन्शिओला येऊन सांगतो. आपल्या सरळमार्गी मुलीला ऑथेलोने जादूटोणा करून फसवले व तिच्याशी आपल्या संमतीशिवाय लग्न लावले अशी तक्रार घेऊन ब्रॅबॅन्शिओ ड्यूककडे येतो. त्याचवेळी व्हेनीसच्या ताब्यात असलेल्या सायप्रस या बेटावर तुर्की आरमाराने हल्ला केला आहे अशी बातमी येते. ड्यूक ताबडतोब आपल्या पराक्रमी सेनापतीला ऑथेलोला या युद्धावर जाण्यासाठी पाचारण करतो. ऑथेलो सुरुवातीला आपल्यावरील आरोपाचे खंडण करतो. आपण जादूटोणा वगैरे काहीही केलेले नाही; आपल्या पराक्रमावर व आपल्या कष्टमय जीवनाच्या आत्मकथेवर प्रभावित होऊन डेस्डेमोनाने आपल्याशी लग्न केले आहे असे प्रामाणिक निवेदन तो करतो. त्याच्या पाठोपाठ आलेली डेस्डेमोनाही त्याला दुजोरा देते. आपल्या आईविहीन एकुलत्या एक लाडक्या मुलीच्या विवाहाला ब्रॅबॅन्शिओ संमती देतो. या आरोपातून मुक्त झालेला ऑथेलो ’जेथे राघव तेथे सीता’ म्हणणाऱ्या डेस्डेमोनाला घेऊन युध्दावर निघून जातो. इयागो आपली पत्नी एमिलिया व कॅसिओ आपली प्रेयसी बियांका यांच्यासह त्याच्या बरोबर युध्दावर निघून जातात

सायप्रस हे व्हेनिसपासून पूर्वेला बरेच दूर भूमध्य समुद्रात एक बेट असते. येथून पुढील सर्व घटना सायप्रस बेटावर होतात. थोड्याच दिवसात ऑथेलो तुर्की आरमाराचा पराभव करून साय़प्रसवर कब्जा मिळवतो. पुढील आदेश येईपर्यंत सर्वजण तेथेच राहतात.

व्हेनीस सोडण्यापूर्वी ऑथेलोने इयागोला डावलून आपल्या हाताखालचा अधिकारी म्हणून कॅसिओला बढती दिलेली असते; यामुळे मत्सरी स्वभावाचा इयागो दुखावला जातो. तो याचा बदला घेण्याची संधी शोधत असतो. त्याचा एक उमराव मित्र रोडेरिगो डेस्डेमोनाचा चाहता असतो, त्याला हाताशी धरून इयागो ऑथेलो व कॅसिओ विरूध्द आपले सूडाचे कारस्थान गुंफायला सुरवात करतो. एका बाजूला तो रोडेरिगोला डेस्डेमोनाचा निकटचा सहवास मिळवून देण्याची लालूच दाखवतो व त्याच्याकडून तिच्यासाठी भेट म्हणून खूप दागिने, जवाहीर लंपास करतो. दुसऱ्या बाजूला तो कॅसिओला एका रात्री खूप दारू पाजून टेहळणीच्या कामात हलगर्जी ठरवतो. परिणाम म्हणून ऑथेलो कॅसिओची बढती रद्द करतो. खिन्न झालेला कॅसिओ इयागोच्या पत्नीमार्फत डेस्डेमोनाची भेट घेतो व तिने आपल्यावरील ऑथेलोची गैरमर्जी दूर करावी अशी विनंती करतो. भोळी भाबडी सरळमार्गी डेस्डेमोना त्याचे हे काम करण्याचे आश्वासन देते; तिला खात्री असते की ऑथेलो आपल्या प्रेमाखातर ही विनंती अमान्य करणार नाही.

इयागो हा अतिशय पाताळयंत्री व धूर्त असतो. तो आपल्या कथानकाचा खलनायक आहे. एका बाजूला तो डेस्डेमोनाची वारंवार स्तुती करून ऑथेलोचा विश्वास संपादन करतो, इतका की ऑथेलो त्याची My dear honest Iago अशी वारंवार भलावण करतो; कॅसिओशी प्रेमाने वागून त्याला कसलीही शंका येऊ देत नाही; तर दुसऱ्या बाजूला तो हळूहळू डेस्डेमोनाच्या एकनिष्ठतेबद्दल त्याच्या मनात संदेह निर्माण करतो. ऑथेलोचा कुरूप काळेपणा व कॅसिओचा मनमोकळा आकर्षकपणा याचा  हुशारीने उपयोग करून तो ऑथेलोचे मन दोघांबद्दल कलुषित करतो. बिचारी डेस्डेमोना इयागोच्या कारस्थानाबद्दल पूर्ण अंधारात राहते व ऑथेलोच्या एकनिष्ठ प्रेमावर विश्वसून राहते.

साधा सरळ शिपाई गडी असलेला ऑथेलो इयागोला आपल्या जीवनातील खाजगी गोष्टी सुध्दा विश्वासाने सांगू लागतो आणि इयागो त्याचा गैरफायदा घेऊ लागतो. कॅसिओ डेस्डेमोनामार्फत त्याची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न करतो आहे हे कळल्यावर इयागो ऑथेलोला सल्ला देतो की तिला टोलवत ठेवून तिचा आग्रह किती तीव्र होतोय त्याची परीक्षा घे. त्यावरून तुला डेस्डेमोना त्याच्यात किती गुंतली आहे हे कळेल. इयागोच्या या धूर्त वागण्यामुळे ऑथेलोच्या मनातील संशयाचे मळभ दाट होत जाते, इतके की इयागोच्या कपटकारस्थानाला तो पूर्ण बळी पडतो व डेस्डेमोनाला बदफैली समजू लागतो.

एक गोष्ट घडते आणि या प्रकरणाचा कडेलोट होतो. ऑथेलोने प्रेमाच्या सुरवातीच्या काळात डेस्डेमोनाला कशिदा केलेला एक सुंदर हातरूमाल भेट दिलेला असतो व तो तिने जिवापाड जपावा असे तिला बजावून सांगितलेले असते. एके दिवशी एमिलिया बरोबर बागेत फिरत असताना तो रूमाल तिच्या हातून कुठेतरी पडतो. एमिलियाला तो सापडतो पण इयागो मोठ्या हुशारीने तिच्याकडून तो रूमाल काढून घेतो व कॅसिओच्या खोलीत त्याला सहज दिसेल अशा ठिकाणी तो ठेवतो. रूमालाबद्दल काहीही माहिती नसलेला कॅसिओ नकळत ऑथेलोसमोर तो रूमाल तोंड पुसायला वापरतो. त्याच्याजवळ तो रूमाल पाहताच ऑथेलोचा संशय बळावतो. तो डेस्डेमोनाला त्या रूमालाबद्दल विचारतो. ती त्याचे समाधानकारक उत्तर देऊ शकत नाही. इयागो या घटनेचा विपर्यास करून ऑथेलोचे मन पूर्णपणे संशयग्रस्त करतो. गोष्टी शेवटच्या थराला येतात. ऑथेलो डेस्डेमोनावर उघड उघड घाणेरडे आरोप करतो आणि निष्पाप डेस्डेमोना हताश होऊन त्याचे आरोप नाकारत राहते; आणि एका रात्री……

डेस्डेमोना निर्धास्तपणे आपल्या गादीवर गाढ झोपलेली असते. ऑथेलो तिचा खून करण्याच्या उद्देशाने शय्यागृहात तिच्याजवळ येतो. एका बाजूला तिच्यावरचे नितांत प्रेम आणि तिची निरागस मुद्रा त्याला मागे खेचत असते. पण संशयाने बेभान झालेला ऑथेलो Should I put out the light? म्हणत तिचा गळा दाबून खून करतो.

शय्यागृहाच्या बाहेरून एमिलिया जोरजोराने दार ठोठावत असते व जिवाच्या आकांताने My Lord, my Lord अशा हाका मारत असते; आत काहीतरी भयंकर घडते आहे अशी शंका तिला आलेली

असते. ऑथेलो दार उघडतो आणि घडलेला प्रकार बघून एमिलिया हतबुध्द होऊन पाहत राहते. ती हळूहळू बोलू लागते आणि तिने दिलेली माहिती ऐकून ऑथेलोचे डोळे उघडतात. कॅसियोचा डेस्डेमोनाशी काहीही संबंध नसतो. त्याचे बियांकावर निस्सीम प्रेम असते. डेस्डेमोना शेवटपर्यंत मनाने आणि शरीराने शुध्द चारित्र्याची असते; ऑथेलोवर निर्व्याज प्रेम करत असते. इयागोने वैयक्तिक सूडासाठी त्याचे मन संशयाने भरून टाकलेले असते. इयागोने स्वतःच्या स्वार्थासाठी रोडेरिगो व कॅसिओ यांना एकमेकाकरवी मारलेले असते आणि कॅसिओने मरता मरता रूमालाबद्दल खुलासा केलेला असतो. डेस्डेमोनाच्या चारित्र्यावर ऑथेलोने फेकलेले सर्व शिंतोडे खोटे ठरतात. मरतानासुध्दा त्याच्या गळयाला मिठी मारून प्रेमाची खात्री देणारी डेस्डेमोना धुतल्या तांदळासारखी निष्पाप निष्कलंक होती आणि आपल्या हाताने त्याने तिचा जीव घेतलेला असतो. पश्चात्तापाने वेडा झालेला ऑथेलो आपली कट्यार आपल्या काळजात खुपसून डेस्डेमोनाच्या जवळ शेवटचा श्वास घेतो. इयागोला पकडून तुरुंगात टाकले जाते.

ऑथेलोच्या संशयी स्वभावामुळे झालेली ही शोकांतिका चटका लावून जाते.